288

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक 06/03/2024

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन ज्ञापन क्र.बांधका-0224/प्र.क्र.25 /पोल-7दि.05/03/2024

**विषय :-** पोलीस अधीक्षक, बीड यांचे अधिपत्याखालील उप विभागीय पोलीस अधिकारी, केज कार्यालयीन इमारत बांधकामासाठी खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे यास सुधारीत प्रशासकीय मान्यता-प्रदान करण्याबाबत

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन ज्ञापन क्र.बांधका-0224/प्र.क्र.25 /पोल-7, दि.05/03/2024 ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक 202403051429192529असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस अधीक्षक,बीड
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक 27

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन / नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन ज्ञापन क्र.बांधका-०२२४/प्र.क्र.२५/पोल-७.**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०००३२.
दिनांक - ५ मार्च, २०२४.

विषय :- **पोलीस अधीक्षक, बीड यांचे अधिपत्याखालील उपविभागीय पोलीस अधिकारी, केज कार्यालयीन इमारत बांधकामासाठी खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे यास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१४/प्र.क्र.४९/१४/विनियम, दि.०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. २०.०९.२०१९.
३) शासन परिपत्रक, सा.बां. विभाग, क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा.-२, दि.२५.०९.२०१९.
४) शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०९१६/प्र.क्र.६२९/पोल-७, दि. १६.०३.२०१७
५) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२७/केज उपविभागीय कार्या./प्रशा.ईमा.बांध.वाढीव निधी/पो.अ.बीड/ ई-५८२६०/२०२३, दि. २९.११.२०२३.

ज्ञापन-

पोलीस महासंचालक कार्यालयाने, पोलीस अधिक्षक, बीड यांनी सादर केलेले उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड कार्यालयीन इमारतीच्या वाढीव बांधकामासाठी रु. १,९७,११,११६/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले आहे.

२. पोलीस अधिक्षक, बीड यांचे आस्थापनेवरील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड कार्यालयीन इमारतींच्या बांधकामासाठी रु.१,९७,११,११६/- इतक्या वाढीव रकमेचे, सन २०२२-२३ च्या दरपत्रकावर आधारीत अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, केज, जि. बीड यांनी तयार केले असून, त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबेजोगाई, जि. बीड, अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, उस्मानाबाद व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी स्वाक्षांकित केले आहे. तसेच त्यास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. तसेच पोलीस अधिक्षक, बीड यांनी त्यास प्रतिस्वाक्षरीत केले आहे.

३. तसेच उक्त खर्चाचे अंदाजास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली असून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास सहमती दिली आहे.

४. उपरोक्त प्रस्तावित कामाच्या मुळ अंदाजपत्रकास शासनाच्या दिनांक १६.०३.२०१७ च्या शासन ज्ञापनान्वये प्रशासकीय मान्यता दिली असून, सदर मुळ अंदाजपत्रक वित्त विभाग शासन

Scanned with CamScanner

निर्णय दिनांक २०.०९.२०१९ पूर्वी दिलेले आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ नुसार रु. १ कोटीपर्यंतचे खर्चाच्या अंदाजास मान्यता देण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुखांना देण्यात आले आहेत. आता त्यामधील वाढीव बांधकामासाठी रु. १,९७,११,११६/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ नुसार रु. १ कोटी पेक्षा जास्त व रु. १५ कोटीपर्यंतच्या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले असल्याने, सदर अंदाजपत्रक शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

५. उपरोक्त बाबीवरील खर्च हा *"गृह विभाग-* **मागणी क्र. बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२११), (योजनातंर्गत), (५३-मोठी बांधकामे)"** या लेखाशीर्षातर्गत उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावे.

६. सदर खर्चाच्या मुळ अंदाजपत्रकास शासनाच्या संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १६.०३.२०१७ च्या ज्ञापनान्वये, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अंदाजपत्रकाच्या आधारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर आता पुन्हा सुधारीत अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अंदाजपत्रकाच्या आधारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

७. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, शासन परीपत्रक दिनांक २५.०९.२०१९ नुसार, "रु. १५ कोटी पेक्षा कमी किंमत असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामांना क्षेत्रीय स्तरावरील मुख्य अभियंता (स्थापत्य) व मुख्य अभियंता (विद्युत) हे सर्वोच्च क्षेत्रीय तांत्रिक अधिकारी असून, तांत्रिक मान्यता प्रदान करणा-या सक्षम अधिका-याने ढोबळ अंदाजपत्रकास सहमती प्रदान केल्यानंतर संबंधित मुख्य अभियंता यांच्याकडून शिफारशीसह प्राप्त अंदाजपत्रकानुसार उपभोक्ता विभाग त्यांच्याकडील त्यांच्याकडील कामाची निकड व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करतील", अशी तरतूद आहे. त्यानुसार सदर सुधारीत अंदाजपत्रकास मुख्य अभियंता (स्थापत्य) यांची मान्यता प्राप्त झाली असून, याबाबतचे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार गृह विभागास आहेत.

८. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आस्थापनेवरील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड या इमारत बांधकामाबाबत रु. १,९७,११,११६/- (अक्षरी रुपये एक कोटी सत्यान्नऊ लाख अकरा हजार एकशे सोळा फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजास, याद्वारे पुढील अटींवर, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) उक्त काम हे सा.बां. विभागामार्फत करण्यात यावे.
२) ज्या भूखंडावर उक्त काम करावयाचे आहे तो भूखंड गृह (पोलीस) विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या नावे आहे, याबाबत खात्री केल्यावरच काम सुरु करावे.
३) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुशास्त्र तज्ज्ञाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे. नगर रचनाच्या दृष्टीकोनातून सदर भूखंडावर बांधकाम अनुज्ञेय आहे, याची खात्री करावी.



Scanned with CamScanner

४) उक्त कामासाठी रु. १,९७,११,११६/- इतक्या रकमेच्या सा.बां. प्रादेशीक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या, अंदाजपत्रकासोबतच्या जोडपत्रातील, "Recapitulation Sheet" मधील विवरणानुसार काम करावे.

५) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

६) कामाच्या निविदा मागविण्याच्या आधी सा.बां. विभागाच्या सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे.

७) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करण्यात यावी.

८) शा.नि., सा.बां. विभाग, क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमा.-२, दिनांक ०७.०७.२०१७, अनुसार कार्यवाही करण्यात यावी.

९) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करण्यात येऊ नये.

९. हे शासन ज्ञापन, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, भाग पहिला, उप विभाग-पाच, अ.क्र.१, अनुसार प्रशासनिक विभाग या नात्याने गृह विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करुन सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०३०५१४२९१९२५२९ हा आहे. हे शासन ज्ञापन डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN BIRA MANE

Digitally signed by NARAYAN BIRA MANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=1dfb457576797050f19aafaa495673fc843c789942459c d39fc5561071b4a70c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79C09BA352C5B3E65B259113F1CDCFAB29FB96 1D4EA9A24411D7F622D2ED20BF, cn=NARAYAN BIRA MANE
Date: 2024.03.05 14:39:13 +05'30'

(नारायण बिरा माने)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, बीड
३. मुख्य अभियंता, सा.बां. प्रदेश, छत्रपती संभाजीनगर ["Recapitulation Sheet" च्या प्रतीसह]
४. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडल, उस्मानाबाद [ "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह]
५. जिल्हा कोषागार अधिकारी, बीड.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. महा लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन अधिकारी (इमा.-२), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कार्यकारी अभियंता, सा.बां.(पूर्व) विभाग, अंबेजोगाई, जि. बीड
१३. निवड फाईल (पोल-७).



Scanned with CamScanner